भारत सरकार पुरस्कृत (१०० टक्के) “निर्भया योजना” याखाली प्राप्त झालेला निधी वितरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक : पूरक-०७१७/प्र.क्र३८१/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : १६ जानेवारी, २०१८.

वाचा :- १) शासकीय अधिसूचना, गृह विभाग, क्रमांक सीपीसी. २११/ प्र.क्र.१०१/ पोल-७, दिनांक ११.०४.२०१४.

२) शासकीय अधिसूचना, गृह विभाग, क्रमांक न्यायाप्र. ०३१६/ प्र.क्र.२६२/ पोल-७, दिनांक ०७.०४.२०१७.

३) भारत सरकार मंजूरी आदेश क्रमांक २४०१३/९४/संकीर्ण/२०१४-सीएसआर.III, दिनांक ०२.०९.२०१६.

प्रस्तावना.-

भारत सरकार पुरस्कृत (१०० टक्के) “निर्भया योजना” *(Nirbhaya Scheme WCD) (भारत सरकार योजना संकेतांक १८८१)* याखाली दिनांक ०२.०९.२०१६ रोजीच्या सदर्भाधीन आदेशाद्वारे रु.१७,६५,००,०००/- इतका निधी वितरित केला आहे. उक्त निधी दिनांक ३०.०९.२०१६ रोजी राज्याच्या एकत्रित निधीत जमा झाला. उक्त निधी सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात अर्थसंकल्पीत झाला आहे.

शासन निर्णय.-

“निर्भया योजना” या भारत सरकार पुरस्कृत (१०० टक्के) योजनेखाली सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात भारत सरकारकडून प्राप्त झालेला रु.१७,६५,००,०००/- *(रुपये सतरा कोटी पासष्ट लक्ष फक्त)* इतका निधी, सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण, मुंबई, यांना वितरित व खर्च करणे यांसाठी, याद्वारे, मंजूरी देण्यात येत आहे.

२. उक्त खर्च हा, *गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, १०८ राज्य मुख्यालय पोलीस, (०८) बळी पडलेल्या व्यक्तिंकरिता नुकसानभरपाई निधी, (०८)(०२) नुकसान किंवा इजा पोहचलेल्या पिडीत व्यक्तींना किंवा त्यांच्या अवलंबितांना निर्भया योजनेअंतर्गत नुकसानभरपाई (१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना) (२०५५ ए०७९) (कार्यक्रम), ५० इतर खर्च,* याखाली चालू (सन २०१७-१८) वित्तीय वर्षात उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३०९/अर्थोपाय, दिनांक १५.०७.२०१७, अन्वये मिळालेल्या वित्त विभागाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०११७११३३०४०४२९ असा आहे. हा शासन निर्णय डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2018.01.17 11:37:26 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण, मुंबई.

प्रतः-

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मुंबई.
३) प्रबंधक, मा. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई/ नागपूर खंडपीठ, नागपूर/ औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद.
४) सचिव, सर्व जिल्हा विधि सेवा प्राधिकरणे.
५) प्रबंधक, सर्व जिल्हा व सत्र न्यायालये.
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
८) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
११) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१२) अवर सचिव (अर्थ-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) कार्यासन अधिकारी (विशा-६), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) कार्यासन अधिकारी (व्यय-७), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) निवड फाईल, पोल-७.